# जिवे मारण्याचा प्रयत्न करून पळून जाणारे अज्ञात आरोपी देवळी पोलीसांचे जाळ्यात

दिनांक २७.०९.२०२१ चे १४.३० वा. ते १४.४५ वा. दरम्यान फिर्यादी राजु रावण मोहीते, रा. धानोरा (माली), ता. चांदुर (रेल्वे), जि. अमरावती हे शिरपूर येथील कापसे पेट्रोलपंप येथे मोटरसायकल मध्ये पेट्रोल भरत असतांना, त्यावेळी तेथे एक पांढऱ्या रंगाची कार आली ज्यामध्ये ४ ते ५ व्यक्ती बसुन होते व त्यातील एका इसमाने पेट्रोलपंप वरील पेट्रोल टाकणाऱ्या व्यक्तीस पेट्रोल टाक लवकर असे म्हणुन अश्लील शिवीगाळ करु लागला. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यास शिवीगाळ कशाला करतो, आमच्या सोबत महिला आहेत असे म्हटले असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचे अंगावर जावुन त्यांचे हातात असलेल्या हत्याराने छातीवर उजव्या बाजुस मारुन गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या कारमध्ये पळुन गेले. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन देवळी येथे अप.क्र. ७३९/२०२१ कलम ११४, ३०७ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचे तपासात यातील अज्ञात आरोपीतांबाबत कोणतीही माहीती उपलब्ध नसल्याने गुप्त बातमीदारांचे माहीतीव्दारे अत्यंत कुशलतेने अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन पांढरकवडा पारधी बेडा, जि. वर्धा येथुन यातील आरोपी क्र. १) इंद्रपाल भोसले, २) अरविंद काळे, ३) रोशन भोसले सर्व रा. पांढरकवडा पारधी बेड, ता. जि. वर्धा यांना ताब्यात घेवुन त्यांनी गुन्हा करतेवेळी वापरलेली एक मारुती नेक्सा एस.एल. 6 ही जप्त करून गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगाव श्री. गोकुळसिंग पाटील यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक श्री. अशोक राणे यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार कुणाल हिवसे, उमेश गेडाम, प्रकाश निमजे, धर्मेन्द्र गिरी, गजानन युवनाथे यांनी केली.